# प्रकरण तिसरे

# ‘शूद्र’ मधील अनुभवांची सामाजिकता


- प्रस्तावना

१. ‘शूद्र’ मधील आंबेडकरी विचारांचा प्रभाव

२. ‘शूद्र’ मधील भूकेचे चित्रण

३. दलितांच्या प्रश्नांचा प्रभावी आविष्कार

४. अस्पृश्य जाणिवेचं वेधक चित्रण

५. ‘शूद्र’ मधील समाजजीवन

६. ‘शूद्र’ मधील समूहभावनेचे दर्शन

७. ‘शूद्र’ मधील समाजिक प्रश्नांचा ऊहापोह

८. ‘शूद्र’ मधील अंधश्रद्धेचे स्वरूप

९. ‘शूद्र’ मधील स्त्रीजीवनाचे चित्रण

१०. उच्चवर्णीयांचा अन्याय आणि दलितांची अगतिकता

११. ‘शूद्र’ मधील बौद्धतत्त्वज्ञानाचा प्रभाव

१२. ‘शूद्र’ मधील चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्धचा विरोध

१३. सारांश

१४. निष्कर्ष

- संदर्भसूची

# प्रकरण तिसरे

## 'शूद्र' मधील अनुभवांची सामाजिकता

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्यात ग्रामीण, स्त्रीवादी, भटका, गुन्हेगार, आदिवासी समाज यांचे उपेक्षित जीवन, जुलूम, अन्याय, अत्याचार यांना आपल्या कलाकृतींचे विषय बनविले. हजारो वर्षांपासून ज्यांनी कधी प्रकाशच पाहिला नाही, त्या अंधारयात्रींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीची धगधगती मशाल हाती दिली. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.' हा क्रांतिमंत्र घेऊन दलित बंडासाठी सज्ज झाला. 'मी कोण?' या प्रश्नातच त्यांना आपले स्वत्त्व गवसले. आणि म्हणूनच हजारो वर्षांच्या गुलामगिरीनंतर प्रथमच त्याने आपला हक्क मागायला सुरुवात केली.

दलित साहित्यामध्ये दलित कादंबरी या प्रवाहाचा विचार करीत असताना आपणास असे दिसून येते की, दलित कादंबरीकारांनी अनेक विषय घेऊन त्या-त्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अंधश्रद्धा, अस्पृश्यता, अन्याय, अत्याचार, आंतरजातीय विवाह, दलितमुक्ती, धर्मांतर, नवबौद्धांच्या समस्या यासारखे अनेक विषय घेऊन दलित कादंबरी समृद्ध होताना दिसते. दलित कादंबरी जितकी समस्याप्रधान आहे तितकीच ती प्रबोधनात्मकही आहे. दलित कादंबरी ही प्रस्थापित कादंबरीपेक्षा वेगळ्या जीवनजाणिवा अधोरेखित करताना दिसते, परंपरावादी हिंदू व्यवस्थेमध्ये जगावे लागणारे गुलामीचे जिणे, सोसाव्या लागणाऱ्या अनंत यातना, यांच्या विरोधी जबरदस्त आवाज उठवून वेदना, विद्रोह, नकार घेऊन १९६० नंतरच्या कालखंडात दलित कादंबरीने मोठी क्रांती केल्याचे निदर्शनास येते.

ज्या धर्माने इथल्या माणसाचे माणूसपण नाकारले त्या धर्माची चिकित्सा करून इथल्या सवर्ण संस्कृतीला हादरे देण्याचे काम दलित कादंबरीकार करू लागला. मुळात दलित साहित्य हे अनेक वर्षांपासून कोंडलेला श्वास आहे. वेदनेचा हुंकार आहे. विद्रोहाची मशाल आहे. या श्वासाला, वेदनेला आणि विद्रोहाला दलित कादंबरीकारांनी आपल्या प्रतिभेने वाट मोकळी करून दिली. त्यांनी दलित कादंबरीला एक नवा तोंडवळा, वेगळी आशयघनता आणि अभिव्यक्तीचे निराळे रूप देण्याचा प्रयत्न केला. आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, ना. रा. शेंडे, माधव कोंडविलकर, केशव मेश्राम, अशोक व्हटकर, बाबुराव गायकवाड, मुरलीधर जाधव, सुधाकर गायकवाड, योगेंद्र मेश्राम, शशिकांत तासगांवकर, शरणकुमार लिंबाळे यासारख्या लेखकांनी दलित कांदबरीला वेगळ्या उंचीवर नेले.

प्रस्तुत प्रकरणात सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कांदबरीतील अनुभवांची सामाजिकता कशा प्रकारची आहे याचा अभ्यास करावयाचा आहे. सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र' ही कादंबरी म्हणजे त्यांच्या परिणत प्रतिभेचा मुक्त आविष्कार होय. पौराणिक वातावरणातून आपल्या समोर येताना ही कादंबरी आजच्या समाजव्यवस्थेचे वास्तव चित्रण आपल्या समोर उभे करते. ''मी शूद्र आहे म्हणजे नक्की कोण आहे?'' या प्रश्नाने अस्वस्थ झालेल्या नागनाथने या प्रश्नाचा शोध घेण्यासाठी केलेली धडपड म्हणजे दलित साहित्यातील ही पहिली लघुकादंबरी होय.

दलित कादंबरीतील अनुभव हे त्या एकट्या नायकाचे न राहता ते सर्व अनुभव त्या संपूर्ण समाजाचे होऊन जातात. चातुर्वर्ण्य व्यवस्था इथल्या माणसाचे माणुसपणच नाकारताना दिसते. अस्पृश्यांची आयुष्येच्या आयुष्य उध्वस्त करताना दिसते. 'शूद्र'

मधील अनुभव हे एकट्या नागनाथच्या वाट्याल आलेले अनुभव नाहीत तर हजारो वर्षांपासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत असे हजारो 'नागनाथ' या वर्णव्यवस्थेला बळी पडलेले दिसतात. 'शूद्र' मधील नागनाथला अस्पृश्य वर्गात जन्माला आल्यामुळे करावा लागलेला संघर्ष हा अत्यंत हृदयद्रावक व तितकाच क्लेशदायक वाटतो. पुराणकाळातील वत्तनीय राज्यातील समाज व्यवस्थेचे चित्र उभे करताना ही कादंबरी त्या काळात सवर्ण समाज शूद्रातिशूद्रांना कशा प्रकारची वागणूक देतो हे या कादंबरीत ठळकपणे दिसून येते.

'शूद्र' मधील अनुभव हा एकट्या नागनाथचा नसून त्या काळातील सर्व अस्पृश्यांचे ते अनुभव आहेत. या संदर्भात कादंबरीच्या सुरुवातीलाच अस्पृश्य असणाऱ्या वृद्धाचे उद्‌गार तत्कालीन परिस्थितीचे स्वरूप स्पष्ट करतात – ''मी जन्माला आलो ते शूद्र म्हणून आणि कदाचित शूद्र म्हणूनच मरणार. ज्या दगडावर कावळ्या-कुत्र्याने विष्ठा टाकावी त्या क्षुल्लक दगडानेही आपला अवमान करावा, आपल्याला छळावे असे आयुष्य आपल्या वाट्याला का यावे? ब्राह्मण-क्षत्रियासारखाच आपला देह असताना केवळ शूद्र म्हणूनच आपण जन्माला का यावे ?''[१] यासारख्या विवेचनातून तत्कालीन परिस्थितीचे स्वरूप लक्षात येते.

एकूणच या कादंबरीतील सर्व अनुभवांना, घटना-प्रसंगांना सामाजिकतेचा स्पर्श झाल्याचे दिसून येते. ते केवळ व्यक्तिगत पातळीवर न राहता सामाजिक पातळीवर पोहचले आहेत. त्यातील वेदना, विद्रोह, नकार, आत्मभान, अस्पृश्यता हे एवट्या नागनाथचे नसून त्या संपूर्ण दलित-अस्पृश्य समाजाचे आहेत.

## १. 'शूद्र' मधील आंबेडकरी विचारांचा प्रभाव

सर्वच दलित कादंबऱ्यांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांची चळवळ, त्यांच्या विचारांचा लेखकावर झालेला परिणाम, या परिणामातून लेखकाची झालेली जडणघडण, डॉ. आंबेडकरांनी उभारलेल्या संस्थांमधून मिळालेले संस्कार, समतेवर आधारलेल्या समाज उभारणीची तळमळ आदींचे उल्लेख आणि दृष्टिकोन स्पष्ट होतात. वेदनेला विद्रोहाची जोड देणे हा आंबेडकरांच्या रक्ताचा स्थायीगुण आहे. आणि यातूनच प्रेरित होऊन दलित लेखक विद्रोही लिखाण करू लागलेले दिसतात.

डॉ. आंबेडकरांच्यामूळेच दलितांना आणि पर्यायाने दलित लेखकांना आत्मभान आणि आत्मशोध यांचा अर्थ समजू लागला. ''शूद्र पूर्वी कोण होते?'' या प्रश्नाच्या अंतिम उपलब्धीपर्यंत डॉ. आंबेडकर पोहचले ते त्यांच्या मनात असणाऱ्या चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेच्या चिडीनेच. मग सुधाकर गायकवाडांसारखा प्रतिभावंत लेखक कसा गप्प बसेल? त्यानेही याच प्रश्नाला समोर ठेऊन 'शूद्र' सारखी कादंबरी लिहिली. या कादंबरीत त्यांनी दलित वेदनेला व विद्रोहाला वाचा फोडली आहे. नागनाथाच्या मनातील धगधगता विद्रोह मांडताना लेखक आत्मभान आणि आत्मशोध स्पष्टपणे नमूद करतो. एके ठिकाणी नागनाथ म्हणतो, ''केवळ शब्दाने माझ्या अंगात संचारलेली वीज नष्ट होण्याइतपत मी दुबळा नाही. अंगाला चिखल फासून कोणाला जगायचे असेल त्याने खुशाल जगावे. भले मला माझी वस्ती सोडायला लागली तरी चालेल. पण मी शूद्र म्हणून जगणार नाही.''[२] ही दलितत्व नाकारण्याची उर्मी

नागनाथच्या ठायी निर्माण होते ती डॉ. आंबेडकर यांच्या विचार प्रभावामुळेच होय.

जन्मभर विद्या, शील आणि स्वाभिमान यांनाच आपली उपास्य दैवते मानलेल्या डॉ. आंबेडकरांनी दलितांमध्ये जो स्वाभिमान निर्माण केला केवळ त्यामुळेच दलित लेखक या दलित मुक्तिसंग्रामात आज नव्या जोशाने लिहीत आहे.

''तुम्ही मला नाद सोड असे सांगता पण ही वस्तीच तू सोडून जा असे सांगत नाही? क्षत्रियाच्या घोड्यानं टाकलेलं लीद कपाळाला लावणे याला तुम्ही स्वाभिमान म्हणता.उलट ब्राह्मण-क्षत्रिय यांच्या खांद्याला खांदा लावून जगणे याला मी स्वाभिमान म्हणतो.''[३] यासारखे उद्‌गार नागनाथ काढतो ते केवळ सुधाकर गायकवाड यांच्या सारख्या लेखकावर झालेल्या आंबेडकरांच्या विचारांमुळे होय. डॉ आंबेडकरांचे विचार अतिशय विद्रोही होते. यशवंत मनोहर यांच्या 'रमाई' या कादंबरीतील आंबेडकरांचे विद्रोही विचार आणि नागनाथचे विचार यात बरेचसे साम्य आहे.

''खालच्या जातीच्या लोकांना पांडुरंग दर्शन देत नाही..... जो देव भक्तांना दर्शन देत नाही. त्या देवाकडे कशाला जायचं आपण ?''[४] ही स्वाभिमानी वृत्ती नागनाथमध्येही आढळताना दिसते.

## २. 'शूद्र' मधील भुकेचे चित्रण

आपली समाजव्यवस्था ही दलितांना धनसंचय करण्याचा अधिकार सरळ सरळ नाकारते. यामुळेच इथले दलित कायमपणाने भुकेसाठी तडफडताना आपल्याला दिसतात. वितभर पोटाचा खळगा भरण्यासाठी दलितांच्या अगतिकतेचा फायदा घेऊन त्यांच्याकडून लाजिरवाणी कामे करून घेतली जातात. त्यांच्यावर अन्याय

अत्याचार केले जातात. प्रसंगी त्यांना आपला प्राणही गमवावा लागतो. या सामाजिक परिस्थितीचे चित्रण 'शूद्र' मध्ये सुधाकर गायकवाड करतात.

नागनाथला भेटलेल्या वृद्धाच्या बालपणीची आठवण याठिकाणी तत्कालीन भूकेचे चित्र डोळ्यापुढे उभे करते. ''जन्मतःच आम्ही कर्मदरिद्री. शेती नांगरुन धान्य पिकवावे म्हटले तर मुद्दामच दिलेली जमीनही दगडाची. आठवते, पाऊस पडला नाही त्यावेळी ओंजळभर धान्य पिकत असे. तेही त्यावेळी मिळाले नाही. आत आतडे पिळवटत होते. म्हणून माझे वडील नगरात गेले. एका ब्राह्मणाच्या अंगणापासून दूर अशा उकिरड्यावर खरकटे पडले होते आणि कुत्रे ते मिटक्या मारीत खात होते. वडिलाने ते कुत्रे हाकलून ते खरकटे ओंजळीत घेतले. परंतु ते दृश्य एका ब्राह्मणाने पाहिले. ब्रह्मान्नास स्पर्श करून ते विटाळले म्हणून वडिलांस घोड्याच्या आसूडाने मारत राजाकडे नेले आणि राजाने काय शिक्षा दिली सांगू तुला ? आईला व मला बोलवून आमच्यासमोर एका उन्मत्त दासाने माझ्या वडिलांच्या शरीरात भाला खुपसून मांस काढले नि दोन बोटांच्या अंतरावर केलेल्या प्रत्येक लाल जमखेत तप्त लोहाचा रस ओतला.''[५]

अशाप्रकारे पोटाचा खळगा भरू पाहणाऱ्या एका व्यक्तीस देहदंडाची शिक्षा भोगणे अपरिहार्य ठरते. भुकेचे हे वर्णन पाहिले की अमिताभ यांच्या 'पड' या कथेची आठवण येते. पोट भरण्यासाठी मनुष्यप्राणी कुठल्याही थराला जाऊ शकतो. मेलेल्या गायीचे मांस खाण्यासाठी जीवघेणी धावपळ करणारे लोक ''पड आलीऽऽऽ पड आली''[६] म्हणत अर्ध्या झोपेतून पळत सुटतात. भूकेची आग विझवण्यासाठी दलित-अस्पृश्य उकिरड्यावरील अन्न काय आणि गायीचं मांस काय.... मनावर दगड ठेऊन पोटात ढकलत असतो.

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपैकी पहिली गरजच जर व्यवस्थित भागत नसेल तर त्याचे जिणे खरोचरच किती भयानक आहे. प्राचीन काळापासून उच्चवर्णीयांकडून होणारी ही पिळवणूक आजही तशीच आहे. मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजतानाही ऋषिकन्या नागनाथच्या तोंडात तो केवळ शूद्र आहे म्हणून पाणी घालत नाही. यातून तत्कालीन जातीयतेचे स्वरूप स्पष्टपणे आपल्यासमोर उभे राहते.

**३. दलितांच्या प्रश्नांचा प्रभावी आविष्कार**

वर्णव्यवस्थेविरुद्ध नागनाथने पुकारलेले बंड म्हणून 'शूद्र' कडे पाहिले जात असले तरी दलित माणसांना रात्रंदिवस भोगाव्या लागणाऱ्या दु:खाचे, यातनांचे चित्रणही या कादंबरीतून येते. अन्याय, अत्याचार, पिवळणूक, जातीयता यांच्या कैचीत सापडलेला दलित अतिशय क्लेशदायक यातनांचा शिकार होतो. त्याच्या आयुष्यातील अंधार पूर्णत: दूर होत नाही. मागासलेपण, विवंचना, दारिद्र्य आणि पर्यायाने येणारे नैराश्य यांनी तो ग्रासलेला आहे. अस्पृश्यतेच्या शापित जीवनाबरोबरच आर्थिक दैन्य, सांस्कृतिक व आर्थिक जीवनातील अनंत प्रश्नांनी दलितांचे जीवन व्यापून गेले आहे. 'शूद्र' या कादंबरीत दलितांच्या प्रश्नांना प्रभावीपणे अधोरेखित करण्याचा प्रयत्न सुधाकर गायकवाड यांनी केला आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अत्याचार, अन्याय, भूक यासारख्या समस्यांना 'शूद्र' मध्ये वाचा फुटतेच पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे दलितांच्या दलितत्वाची जाणीव, दलितांच्या अस्तित्वाचा शोध, त्यांचे मृतावस्थेत असलेले स्वत्व यांना खऱ्या अर्थाने वाचा फोडण्याचे काम ही कादंबरी करते. ''केवळ शूद्र म्हणून बापची क्रूर हत्या का व्हावी हा पहिला प्रश्न घेऊन मी भटकत आहे.''[७] यासारखी वाक्ये दलितांच्या प्रश्नांना प्रभावीपणे स्पष्ट करतात.

"केवळ आपल्या सावलीने ब्राह्मणांच्या अंगावर का व केस पाप उगवते याचे त्याला कोडे पडले."[८] यासारख्या वाक्यातून लेखक स्पृश्यास्पृश्यतेतील भेदाभेद स्पष्ट करतात. माणुसकीच्या भावनेने सवर्ण कधीही दलितांकडे पाहत नाहीत. 'शूद्र' या कांदबरीतील प्रश्न आणि 'दंगल' या शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील प्रश्न एकाच पातळीवरचे वाटतात. कारण त्यातही 'हणम्या' ओंजळभर पाण्यासाठीच मरून जातो. " 'मूत पियाचा हुतास कुणाचं तर ! हिथं का तुझ्या मायीची भाड हाय!' हणम्या खूप गयावया करतो....... पण आडदांड व खुनशी सावकार हणम्याच्या मानेवर रूमणं मारतो. वंजळभर पाण्यासाठी वंजळभर रक्त वकून हणम्या मरुन पडतो."[९] नागनाथ काय आणि हणम्या काय दोघेही एकाच व्यवस्थेचे बळी पडलेले दिसतात.

"अरे, तू अजून लहान आहेस वाटते ! परमेश्वराच्या पायापासून आपला जन्म झाला. तेव्हापासून छातीवर शूद्र हा कलंक घेऊन आपण वावरू लागलो."[१०] यासारख्या मानसिकतेतून आपल्या वाट्याला आलेले दारिद्र्य, दु:ख, अन्याय, अत्याचार हे सहज स्वीकारून अंधारमय आयुष्य स्वीकारण्याची दलितांची मानसिकता हाच मोठा प्रश्न आहे, असे लेखक नमुद करताना दिसतात.

## ४. अस्पृश्य जाणिवेचे वेधक चित्रण

"काटेरी निवडुंगासारखे काटेरी आयुष्य घेऊन उन्हे झेलण्यासाठीच आपण जन्माला आलो का?"[११] हा प्रश्न नागनाथच्या मनात जेव्हा निर्माण होतो तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, त्याला खऱ्या अर्थाने अस्पृश्यतेची जाणीव झाली आहे. सुधाकर गायकवाड नागनाथच्या मानसिकतेतून येणारे अनुभव अतिशय

परिणामकारक रीतीने वर्णन करतात. या अस्पृश्य जाणिवेचे चित्रण दलित साहित्यात सर्वच दलित कादंबरीकारांनी प्रभावीपणे केलेले दिसते. शंकरराव खरात ''मी माझ्या गावच्या शोधात'' या कादंबरीत या अस्पृश्य जाणिवेचे चित्र रेखाटताना म्हणतात, ''आईबापाचा नाचारगती दुबळा संसार. गाडग्या-मडक्यांचा अन् चार भांड्या बासनांचा. घरातल्या भांड्याकुंड्यातून फाटक्या कपड्या-चिंध्यातून दारिद्र्य तोंड वासून बघत होते. सगळ्या घरादाराला गिळायला ते आपला जबडा आ वासून कायमचं उंबऱ्यात बसलेलं होते. ''[१२] इथे शंकरराव खरात आणि सुधाकर गायकवाड यांच्या अस्पृश्य जाणिवेतील साम्य ध्यानात घेण्यासारखे आहे.

परमेश्वरानेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे समाजाचे चार भाग केले आहेत. अशा चुकीच्या धारणेतून अस्पृश्य - शूद्रांच्या अस्तित्वालाच धक्का दिला आहे. ''अरे शूद्रा, असे का पाहतो आहेस ? ब्राह्मणावर डोळे रोखले तरी शूद्राचे डोळे फोडले जातात. हे तुला माहीत नाही काय ?''[१३] हे ऋषिकन्येच्या तोंडचे वाक्य तत्कालीन समाजव्यवस्थेतील अस्पृश्यतेची प्रचिती देते.

जातिव्यवस्था हा हिंदू संस्कृतीस लागलेला कलंक आहे. मनुष्य हा त्याच्या बुद्धीने-ज्ञानाने श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या जातीने श्रेष्ठ ठरतो यावर आजही विशिष्ट समाज ठाम आहे. अस्पृशांना त्यांच्या गुलामीची जाणीव होऊ नये म्हणून उच्चवर्णीयांनी अगदी योग्य अशी व्यवस्था केली आहे. आपण जेव्हा ब्राह्मण-क्षत्रियांच्या डोळ्यासमोर येतो तेव्हा लाथाडले जातो. याची जाणीव नागनाथला जेव्हा होते तेव्हाच त्याच्या अस्मितेला जोरात ठेच लागते. अस्पृश्य म्हणजे गुलाम, गुलामी हेच त्याचे आद्यकर्तव्य अशी धारणा प्रत्येक शूद्र स्त्रीपुरुषाची असते. हा

अस्पृश्यतेचा डाग पुसण्यासाठी नागनाथ मृत्यूच्या शेवटच्या श्वासापर्यंत झगडतो पण तरीही त्याला त्यात यश येत नाही.

असे असले तरी सुधाकर गायकवाड यांना एक गोष्ट प्रकर्षाने सांगण्याची आहे ती ही की, शूद्राशूद्र हा भेद अनंत काळापासून चालत आला आहे तो पुढेही तसाच राहील. त्याच्या स्वरूपात किंचित बदल होईलही पण तो समुळ नष्ट होणे केवळ अशक्य आहे. असे असताना लेखक कादंबरीच्या शेवटी नागनाथच्या तोंडून एक वाक्य सांगतो की, ''हे चक्र असेच चालत राहणार शेवटच्या माझ्या अंतिम विजयापर्यंत व तुझ्या अंतिम पराभवापर्यंत'' [१४] यातून लेखकाला हे तरी स्पष्ट करायचे नाही ना की, अस्पृश्यतेबरोबरच व चातुर्वर्ण्यव्यवस्थेबरोबरच त्यांच्यातील संघर्षही चिरंजीव राहील. काही असो, 'शूद्र' या कादंबरीत अस्पृश्य जाणिवेचं वेधक चित्रण सुधाकर गायकवाड यांनी उभे केले आहे यात शंका नाही.

## ५. 'शूद्र'मधील समाजजीवन

कोणत्याही कलाकृतीमध्ये जाणीवपूर्व समाजजीवनाचे चित्रण येत नसते, तर लेखकांचे संदर्भ त्या समाजाशी निगडित असतात. म्हणूनच स्वाभाविकपणे समाजचित्रण घडत जाते. विषम समाजरचना, धर्मांधता, आचार-विचाराची पद्धत, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, रीतिरिवाज, दारिद्र्य, हेवेदावे या सर्वांचे चित्रण 'शूद्र' या कादंबरीतून येते. 'शूद्र' मध्ये तत्कालीन समाजाची दयनीय स्थिती, दलितांचे होणारे हाल, स्त्रियांवर होणारे अत्याचार, त्यांची पिळवणूक, सवार्णांचा दलितांकडे-शूद्रांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांचं चित्रण येते.

दलित कादंबरीमध्ये कथानकातून दलित जीवनाची कथा व्यक्त होते. ही कथा त्याची एकट्याचीच कथा राहत नाही तर ती सर्व समाजाची असते. 'शूद्र' मधील कथानक हे जरी नागनाथभोवती फिरत असले तरी त्या कथानकावर तत्कालन समाजजीवनाचा प्रभाव जाणवतो. नवीन परिवर्तन घडवू वाहणाऱ्या एका 'शूद्र' युवकाचा प्रश्न हा त्याच्या अवतीभोवती असणाऱ्या अस्पृश्य समाजाचाही आहे. चातुर्वर्ण्य समाजरचना प्रमाण मानणारा या कादंबरीतील समाज हा ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र या चार गटात विभागला आहे. कर्मकांडाचे अतिशय भयावह स्तोम या कादंबरीच्या पानापानात दिसून येते. 'शूद्रा'ने विद्या शिकू नये हा प्रघात आहे. अशा परिस्थितीत नागनाथला एक योगी त्याने त्याच्याकडून ज्ञान घेतले म्हणून शाप देताना म्हणतो, ''मला प्राप्त झालेले ज्ञान मी प्रथम एका शूद्रास सांगितले. माझी संपूर्ण तपश्चर्या वाया गेली. अरे शूद्र चांडाळा ! तू आपली कक्षा ओलांडून माझे ज्ञान ग्रहण केलेस. शंभर जन्म तू रक्तपिती होऊन फिरशील, तुला मुक्ती नाही; कदापि नाही.''[१५]

येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, वर्णव्यवस्थेवर आधारित समाजव्यवस्थेत प्रत्येक वर्णाची कामे ही ठरलेली आहेत. त्यात तिळमात्र बदल होणे शक्य नाही. शोषण, पीडा व लाचारी पत्करून या कादंबरीतील अस्पृश्य समाज जगत आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याच्या युयुत्सुवृत्तीने या अस्पृश्य समाजाला यत्किंचितही स्पर्श केलेला नाही. याबाबत नागनाथच्या वडिलांचे उद्‌गार फारच समर्पक वाटतात. ''राजाचा नुसता दूत आला तर हे लोक पटापटा त्याच्या पायावर लोळण घेतील. 'यानेच आम्हाला फितवले' असे म्हणून तेच तुझ्याकरिता सूळ उभा करतील. हे लोक म्हणजे शेवाळे खाऊन दगड मोजणार. मान ताठ ठेवणारे तुझ्यासारखे

फक्त एक -दोनच''[१६] यासारख्या वाक्यातून तत्कालीन अस्पृश्य समाजाच्या लाचारीचे चित्र तर उभे राहतेच पण त्याचबरोबर वर्णव्यवस्थेचा प्रचंड पगडाही दिसून येतो.

प्राचीन काळापासून सहन करीत आलेल्या अस्पृश्यतेच्या वेदनेला 'शूद्र' या दलित कादंबरीने अधिक महत्त्व तर दिलेच आहे आणि त्याचबरोबर जातिव्यवस्था, रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, विषमता यांनी ग्रासलेला समाजही चित्रित केला आहे.

## ६. 'शूद्र'मधील समूहभावनेचे चित्रण :

कोणताही समाज हा त्या-त्या समाजातील व्यक्तींनी बनत असतो. आणि त्यातूनच त्यांच्यात समूहभावना निर्माण होत असते. दलित समाजाच्या भीषण अवस्थेचे, दारिद्र्याचे, अज्ञानाचे, गावकुसाबाहेर असणाऱ्या वस्तीचे, तिथल्या पिचल्या गेलेल्या माणसांचे दुःख, माणुसकीला पारख्या झालेल्या हाडामासांच्या माणसांवर होणारे अन्याय-अत्याचार 'शूद्र' या कादंबरीत दिसून येतातच पण त्याचबरोबर ह्या अवहेलनेबरोबर केलेला संघर्ष, प्रत्यक्षात अनुभवलेले दलित जीवन, प्रस्थापित वर्गासमोर मांडून आपल्या स्वत्वासाठी, आपल्या हक्कासाठी जागृत झालेला समाजही दिसून येतो.

अस्पृश्य समाज संघटित झाला तर हजारो वर्षे चालत आलेल्या रूढी-परंपरा, अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती याविरुद्ध विद्रोह करू शकतो, परंपरेला धक्का देऊ शकतो याची जाणीव नागनाथला होते आणि आपल्या भावंडांना, मित्रांना एकत्र करून लढण्यास सज्ज होतो. ''आयुष्यावर शूद्राचा डाग घेऊन गवतासारखे जगण्यापेक्षा छातीत बाण घेऊन श्वास थंड केलेला काय वाईट?''[१७] असे म्हणून

पेटून उठलेल्या नागनाथला छन्ना, सागला, उन्ना हे सर्व मित्र लढ्यासाठी मदत करतात. पुढे विसुदत्त, नागसेन, केसुमती हेदेखिल भेटतात. छन्नाच्या ठायी निर्माण झालेल्या समूहभावनेच्या उर्मीतूनच तो पुढे म्हणतो, ''तुम्हाला या सुरक्षित भिंतीच्या आड किड्यासारखे जगायचे असेल तर खुशाल जगा, आम्ही जगणार नाही. नाथ, तू मुळीच घाबरू नकोस आम्ही तुझ्यासाठी सर्व तरूण सैन्य उभे करतो. पण तू म्हणतोस त्याप्रमाणे आयुष्याचा चिखल करणारा हा शूद्र डाग नाहीसा करायचा म्हणजे करायचाच.''[१८]

वर्णव्यवस्थेमुळे दबलेल्या मनाचा संयम एकदा सुटला, त्याची क्षमता, कुवत संपली की संधी मिळताच तो दुप्पट वेगाने आणि क्रोधाने बाहेर पडते. या कादंबरीतील नागनाथ, छन्ना, उन्ना, विसुदत्त, नागसेन, केसुमती हे याच समुहभावनेचे प्रातिनिधिक रूप आहे. ''आपल्या रक्ताच्या सर्व बांधवांना आपण एकत्र करायला हवे. त्यांना लख्ख निळे आकाश दाखवायलाच हवे. त्यांना डावलून कसे चालेल?''[१९] या निश्चयातूनच नागनाथ या कादंबरीतील त्याच्या माणसांना, मित्रांना एकत्र करतो. या समूहभावनेपाठीमागे लेखकाने स्वीकारलेली सामाजिक बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते. हिं. गो. बनसोडे यांच्या 'मुक्तिसंग्राम' मधील ''आमच्यावर लादलेली कामं आम्ही करणार नाही.''[२०] ही विद्रोहाची भावना आणि नागनाथची विद्रोही भावना या याच समूहभावनेच्या प्रेरणेतून निर्माण झाल्या आहेत.

## ७. 'शूद्र' मधील सामाजिक प्रश्नांचे चित्रण

विषम समाजव्यवस्थेच्या प्रभावक्षेत्रातून सर्वमान्यता पावलेले अस्पृश्यतेचे चटके सोसत इथला शुद्रातिशूद्र समाज हजारो वर्षापासून पिचला गेलेला आहे. कर्मकांडांनी बरबटलेल्या धर्मग्रंथांचा पुरस्कार करणाऱ्या सत्ताधारी-स्वयंतुष्ट

दडपशहांनी, ज्ञानवंतांनी अज्ञानी-अशिक्षित असलेल्या अवर्ण माणसाला पूर्णत: नगण्य ठरविले आहे. त्याचे शोषण केले आहे. त्याला अर्थवंचित, ज्ञानवंचित आणि शस्त्रवंचित केले आहे. आयुष्य म्हणजे भूक-पोटाची आग, गरिबी आणि दैन्याचे बापुडवाणे जगणे, कोणतेही पाऊल टाकताना आणि हक्काची मागणी करताना इथल्या अस्पृश्याला आपले सर्वस्व पणाला लागले आहे. 'शूद्र' ही कादंबरी याच सामाजिक प्रश्नांच्या उद्रेकातून जन्माला आली आहे.

या कादंबरीत ज्ञानापासून वंचित असलेला समाज आहे, उच्चवर्णीयांकडून दडपलेला, पिळला गेला समाज आहे. यातील प्रत्येक पात्र अज्ञान, अंधश्रद्धा, अगतिकता आणि अपमानाच्या गर्तेत सापडलेले आहे. या कादंबरीत वितभर पोटाचा खळगा भरण्यासाठी छातीत भाला खुपसून घेणारा वृद्ध आहे. उच्चवर्णीयांच्या अत्याचारी बलात्काराला बळी पडलेल्या स्त्रिया आहेत. किड्या-मुंग्यासारखी सहज मारली जाणारी माणसे आहेत आणि मृत्युशय्येवर असताना घोटभर पाण्यासाठी तडपडणारा नागनाथ आहे. अज्ञान, अत्याचार, दारिद्र्य, अपमान, अंधश्रद्धा, सवर्णांकडून होणारा शारीरिक-मानसिक छळ, जातीयता यासारख्या असंख्य प्रश्नांची रेलचेल 'शूद्र' च्या पानापानात दिसून येते.

'शूद्र' मध्ये शब्दांनाही गोठवणारे क्रौर्य आहे. या क्रौर्यातूनच नागनाथ, अम्मासारखे युवक बळी पडलेले दिसतात. उच्चवर्णीयांच्या अन्याय-अत्याचारातून बकाल झालेल्या अस्पृश्यांच्या दैन्य-दास्याचे चित्रण करणारी 'शूद्र' ही कादंबरी मोठ्या ताकतीने सामाजिक प्रश्नांचे चित्रण करताना दिसते.

## ८. 'शूद्र' मधील अंधश्रद्धेचे चित्रण :

अस्पृश्य समाज हा उच्चवर्णीयांनी ठरवून दिलेले चाकोरीबद्ध जीवन जगत असतो. या जीवनपद्धतीच्या पलीकडे वेगळे काही आहे याची त्याला जाणीव नसते. परंपरेच्या, अंधश्रद्धेच्या, जातीयतेच्या जोखडाला त्याची मानगुट सतत लटकलेली असते. त्याची नजर इकडे तिकडे जाऊच शकत नाही. आणि मग 'हे असेच का?' हा प्रश्नच त्याच्या मनाला स्पर्श करत नाही. अनंत अनादिकाळापासून अंधारात खितपत पडलेल्या या समाजाला प्रकाशाचे मोलच समजत नाही आणि मग तो अंधश्रद्धेच्या अमानुषतेला सहज बळी पडतो.

अंधश्रद्धा हा आपल्या आयुष्याला लागलेला शाप आहे याची जाणीव अस्पृश्य समाजाला नसते कारण त्यांच्यासाठी ज्ञानाची कवाडे आपल्या विषम समाजव्यवस्थेने प्राचीन काळापासून बंद केली आहेत. 'शूद्र' या कादंबरीत नागनाथ घरी आल्यावर त्याचे संघर्षशील विचार ऐकून त्याच्या आईच्या मनात नागनाथला पिशाच्चबाधा झाली असावी अशी शंका येते, हे घडते ते या अज्ञानातूनच. नागनाथची आई, पत्नी आणि वडील हे सर्वच या अंधश्रद्धेला बळी पडलेले दिसतात. नागनाथला पिशाच्चबाधा होऊ नये म्हणून त्याच्या आईने नागनाथला नगराकडे जाताना एक विशिष्ट भांडे दिलेले असते. हातात हाडे घेऊन पांढऱ्या राखेने अंग लिंपलेला मांत्रिकही या कादंबरीत आहे. होरा सांगणे, अंगारा लावणे, पशूबळी देणे यासारख्या अंधश्रद्धा या कादंबरीत डोकावताना दिसतात.

दलित-अस्पृश्यांमध्ये अंधश्रद्धेचे स्तोम माजविण्यात हा उच्चवर्णीय समाजच कारणीभूत आहे. वर्षानुवर्षे अज्ञानाच्या खाईत ढकललेल्या अवर्ण समाजात

अंधश्रद्धेशिवाय ज्ञानाचे प्रकाशकिरण कसे येतील ? जन्मभर स्वत:स 'शूद्र' म्हणवून घेऊन लाचारीचे जीवन जगणे ही अंधश्रद्धा नाही तर आणखी काय आहे ?

## ९. 'शूद्र' मधील स्त्रीजीवनाचे चित्रण

पुरूषप्रधान भारतीय संस्कृतीमध्ये आजही स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत घरात आजही स्त्रीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शोषण होते. त्यातही दलित स्त्रीची स्थिती त्याहूनही भयावह आहे. प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती यांना बळी पडलेली दलित स्त्री स्वत:हून कोणत्याही दुष्कृत्यास बळी न जाता जबरदस्तीने, नाइलाजाने आणि नाखुशीने आपल्या कुटुंबासाठी परिस्थितीशरण होते. स्त्रीला मन नसते, भावना नसतात, तिचे अस्तित्व शून्य असते अशा दृष्टीनेच तिच्याकडे एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते. 'शूद्र' या कादंबरीत जे स्त्रीजीवन लेखकाने चित्रित केले आहे ते अत्यंत भयावह आहे.

शूद्रस्त्रियांना जेव्हा राजाकडे नेले जाते तेव्हा तेथील परिस्थिती स्त्रीदु:खाचे दारूण कारूण्य स्पष्ट करते. ''राजसैनिकांनी प्रत्येक स्त्रीचे स्तन कापले, त्यांचा गुप्तभाग भाल्याने जखमी केला. नि मांड्यांवरून रक्त ओघळत असतानाच त्यांचे पाय, दोरखंडांनी बांधून त्यांची शेवटची टोके दहा घोड्यांच्या पोटास बांधली; आणि क्षणात घोडे चौखूर उधळले.''[२१] या विसपालच्या उद्‌गारातून तत्कालीन दलित स्त्रीची अवस्था सहज लक्षात येते. एकीकडे ब्राह्मण कुटुंबातील ऐशोआरामातील ऋषिकन्या लेखक चित्रित करतो तर दुसरीकडे परिस्थितीने अगतिक, हतबल झालेल्या अस्पृश्य स्त्रियांचे दु:ख मांडतो.

कोणत्याही कृत्याचा राग तत्कालीन अबला स्त्रीवरच का काढला जातो ? हा एक महत्त्वाचा मुद्दा लेखक मांडताना दिसतो. खरं तर राजाच्या विरुद्ध बंड पुकारले

ते नागनाथ, अम्मान, छन्ना, विस्सगुप्त, सागला यांनी; पण असं असतानाही त्याची शिक्षा मात्र भोगावी लागली ती त्यांच्या स्त्रियांना. का ? कारण त्या अबला आहेत, अगतिक आहेत म्हणून. विसपाल पुढे सांगतो, ''आणि तुझ्या अम्मानच्या, छन्ना, विस्सगुप्त, सागला यांच्या स्त्रियांवर दहा मल्ल सोडले. पानाप्रमाणे त्यांनी त्यांना कुस्करलं. पाशवीपणाने त्या दहा जणांनी त्यांच्यावर बलात्कार केला.''[२२] हे वर्णन ऐकल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, प्राचीन काळात काय आणि आता काय; स्त्रीच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन तिच्यावर शारीरिक आणि मानसिक अत्याचार करणाऱ्यांची यादी कधीही न संपणारी आहे.

या कादंबरीतील बलात्काराची घटना आणि विजय काळे यांच्या 'जागृती' या कादंबरीतील घटना यात काळ सोडला तर काहीही फरक नाही. ''सूडाने पेटलेले हंबीरराव तिच्याकडे पाहून हसतात. रखमा गर्भगळित होऊन पाहते. हात जोडून विनवण्या करते. घरी जाऊ द्या म्हणून हंबरडा फोडते. पण पाटील, सरपंच व त्याचे साथीदार रखमेवर झडप घालतात. रखमेच्या साडीच्या चिंध्या बाभूळवनातील वाऱ्यावर फडफडतात.''[२३] या रखमामुरळीच्या दु:खाला अनादिकाळापासून सुरवात झाली आहे आणि त्याला पूर्णविराम मिळण्याची शक्यता धूसर आहे. बाबुराव बागुलांच्या 'सूड' या लघुकादंबरीतील मुरळीची पोर ''जानकी तिला नेहमी अडवणारे, तिचे उर चुरगळणारे, तिला कवटाळणारे आणि पैसे दाखवून तिला खुणावणारे टोळके तिच्या विषयी अश्लील बोलत तिच्यावर तुटून पडते.''[२४] हे सर्व आजच्या स्त्रीचे दु:ख, दास्य, दैन्य आणि 'शूद्र' मधील स्त्रीचे दैन्य यात काहीही फरक नाही.

एकूणच 'शूद्र' मध्ये सुधाकर गायकवाड यांनी अत्यंत थोडक्यात पण परिणामकाररित्या तत्कालीन स्त्रियांच्या दास्याचे, दैन्याचे वेधक चित्रण केलेले दिसते.

## १०. उच्चवर्णीयांचा अन्याय आणि दलितांची अगतिकता :

रक्तालांच्छित वेदनांचा आक्रोश पाठीशी घेऊन वाटचाल करणाऱ्या जीवनाचे निराळेपण हेच दलित वाङ्मयाचे प्रस्थापित पांढरपेशी साहित्यातून वेगळे असे वैशिष्ट्य आहे. जीवनातील भेदक अंतर्विरोधाची भेदक समीक्षा करीत जीवनाच्या उन्नयनाच्या वाटा मोकळ्या करण्याचा प्रतिज्ञेतून, आंबेडकरी तत्त्वज्ञानातून प्रेरित झालेल्या दलित लेखकाने हजारो वर्षांपासून बंदिस्त असलेल्या दलितांच्या अन्याय-अत्याचार, दारिद्र्य, दास्य, उपासमार, बेकारी, शारीरिक-मानसिक छळ यांना दलित लेखकाने बिनदिक्कतपणे दलित साहित्यातून मांडून पांढरपेशी साहित्यात खितपत पडलेल्या वाचकाला नवे अनुभव, नव्या जीवनजाणिवा निदर्शनास आणून देऊन आश्चर्यचकित करून सोडले.

मनुप्रणित विशिष्ट तत्त्वांवर आधारलेला हिंदू समाज दलितांना कधीही आपल्याबरोबर घेऊन जात नाही. त्याला मांडीला मांडी लावून पंगतीला आणि पलंगावरही बसायला देत नाही. आपली सत्ता, हक्क आणि मिरासदारी कमी होईल म्हणून दलितांना कधीच त्यांच्या हक्काची अंमलबजावणी करण्यास उच्चवर्णीय समाज परवानगी देत नाही. रूढी, परंपरा, कर्मकांड, देवधर्म इ. अनिष्ट प्रथांनी उच्चवर्णीयांनी वर्षानुवर्षे दलितांची गळचेपी केली आहे. त्यांना परिस्थितीपुढे हतबल होण्यास भाग पाडले आहे. 'शूद्र' या सुधाकर गायकवाड यांच्या कादंबरीत या अन्याय-अत्याचाराचे आणि त्यातून निर्माण झालेल्या हतबलतेचे आणि अगतिकतेचे चित्रण आलेले आहे.

ज्यांना ज्ञान म्हणजे काय? प्रकाश म्हणजे काय? हेच माहीत नसलेल्या नागनाथच्या वडिलांसारख्या असंख्य लोकांच्या अगतिकतेची सल या कांदबरीत आढळते. नागनाथला भेटलेल्या वृद्धाच्या वडिलांना राजाच्या ''उन्मत्त दासाने छातील भाला खुपसून मांस बाहेर काढले आणि दोन बोटांच्या अंतरावर केलेल्या प्रत्येक लाल जखमेत तप्त लोहाचा रस ओतला !''[२५] हा उच्चवर्णीयांचा अत्याचार अतिशय भयानक आणि किळसवाणा आहे. या कांदबरीतील राजाचे उन्मत्त सैनिक असोत, ऋषीमुनी असोत, किंवा त्यांची कन्या असो ही सर्वच पात्रे तत्कालीन उच्चवर्णीयांचे प्रतिनिधित्व करतानादिसतात. त्यांच्या अन्याय-अत्याचारामुळेच नागनाथच्या भावंडांना, मित्रांना, त्यांच्या स्त्रियांना, आणि खुद्द नागनाथला बळी पडावे लागते. रणजित देसाई यांच्या 'समिधा' या कादंबरीतील 'तुकाराम देवबा कांबळे' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आणि 'शूद्र' मधील नागनाथ यांना याच समाजव्यवस्थेने बळी पाडल्याचे दिसते. ''जगायचंच तर माणूस म्हणून जगू; न्हाई तर उपाशी मरू. बाबा हे सांगून सांगून खपलापन तुमाला तेची लाज न्हाई.''[२६] म्हणणारा तुका आणि 'शूद्र'मधील विद्रोहाने पेटलेला नागनाथ यांचा अंत उच्चवर्णीयांच्या अन्यायाचे प्रतीक आहे.

उच्चवर्णीयांच्या अत्याचाराला प्रतिकार करण्याचे धाडस दलितांच्या मनाला स्पर्शूही शकत नाही आपण कर्मदरिद्रीच आहोत या मानसिकतेतून सर्व शूद्र हा अन्याय निमुटपणे सहन करतात. दलितांचे दलितत्व स्वीकाण्याची मानसिकता सुधाकर गायकवाड या कादंबरीत ठळकपणे नमुद करतात. ''खडकावर अंग घासले तरी कावळ्याला आकाशाचे पांढरेशुभ्र फूल होता येत नाही. एकदा का परमेश्वराने आपल्या अंगावर खूण केली की तिच स्वाभिमानाने गांजरत तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य

आहे. परमेशध्वराने क्षत्रियाच्या हाती शस्त्र दिले, ब्राह्मणाच्या हाती वेद दिले नि आपल्या हाती त्यांची सेवा करण्याचे कर्म दिले; ते काय परमेश्वर खुळा होता म्हणून? परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध काही करणे म्हणजे स्वत:साठी स्वत:च गळफास तयार करणे. म्हणून सांगतो, तू माझे ऐक. नि हे डोक्यात घातलेले खूळ काढून टाक.''[२७] यासारख्या विधानातून दलित मानसिकतेचा अंदाज येतो. अज्ञानाच्या घोर अंधारात पडलेल्या अस्पृश्याला विज्ञानवादी दृष्टिकोन स्पर्श करणे तत्कालीन काळात शक्यच नव्हते. त्यामुळे हा अगतिक दलित उच्चवर्णीयांच्या अन्यायाला बळी पडलेला दिसतो.

चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असूनही 'शूद्रा'ला त्याचे म्हणून स्वत:चे असे असणारे अस्तित्वच ही समाजव्यवस्था नाकारते. अज्ञानाच्या गर्द अंधकाराने ग्रासलेला दलित मग सहजपणे असे म्हणून जातो की, ''परमेश्वराच्या पायापासून आपला जन्म झाला. तेव्हापासून छातीवर शूद्र हा कलंक घेऊन आपण वावरू लागलो.''[२८] ही मानसिकता प्रत्येक अस्पृश्याची होण्यामागे त्याचे असणारे अज्ञान, अगतिकता आणि उच्चवर्णीयांकडून होणारी पिळवणूक, अन्याय-अत्याचारच कारणीभूत ठरतात. ना. बं. जाधव यांच्या 'दे दान सुटे गिऱ्हाण' या कादंबरीतील उच्चवर्णीयांचा अन्याय आणि दलितांची पिळवणूक 'शूद्र' प्रमाणेच थक्क करून सोडणारी आहे. काळ बदलला पण परिस्थितीत तिळमात्र बदल झालेला नाही. ''मेडिकल कॉलेजमध्ये परिक्षेला बसणाऱ्या अनुसुचित जाती जनजाती या वर्गाच्या उमेदवारास उत्तरपत्रिकेवर आपल्या जातीचा उल्लेख अनिवार्य आहे. का? तर उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांना या मुलांचा गळा कापता यावा म्हणून. गेल्यावर्षी या परीक्षेत एकही विद्यार्थी उत्तीर्ण झाला नाही. मॅट्रीकच्या परीक्षेत प्रथमश्रेणीत पास

होणारा या परीक्षेत सपशेल नापास? का या वर्गाकरता राखून ठेवलेल्या जागा पुन्हा सवर्ण हिंदूना मिळाव्या म्हणून.''[२९]

वरील वर्णन पाहिले की उच्चवर्णीयांच्या पिळवणूकीची, अन्याय-अत्याचाराची किव करावीशी वाटते. 'शूद्र' च्या पानापानातून या अत्याचाराचा प्रत्यय तर येतोच शिवाय दलितांच्या अगतिकतेचे दर्शनही घडते.

## ११. 'शूद्र' मधील बौद्धतत्त्वज्ञानाचा प्रभाव :

डॉ. आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार हा दलित साहित्याचा प्राण आहे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या जीवनातील प्रत्येक घटनेचा दलित साहित्यावर प्रभाव जाणवतो. मग तो मनुस्मृतीचे दहन असो, चवदार तळ्याचा उठाव असो, पुणे करार असो किंवा धर्मांतर असो; या प्रत्येक घटनेने दलितांच्या आत्मविश्वासास पोषक वातावरण निर्माण केले. डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील धर्मांतराची घटना ही एकूण दलित साहित्याला वेगळे वळण देणारी आहे. त्यांनी स्वीकारलेल्या बौद्ध धम्माची तत्त्वप्रणाली दलितलेखक अनुसरू लागला. या धर्मातील आदर्श जीवनपद्धतीचा प्रभाव एकूण दलित साहित्यावर व पर्यायाने दलित कादंबरीवर दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या सिद्धांतामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाचा एक मौलिक धागा गुंफलेला आहे. बुद्धांचा शांतीचा -अहिंसेचा मार्ग आहे. तसा तो अनात्म, अनिश्वरवादाचाही आहे. दु:ख दूर करण्यासाठी अष्टांगिक मार्गाचा अवलंब करण्याची जरी शिकवणूक त्यात आहे, तरी बौद्ध धर्म हा शुद्ध नैतिक आचाराचा धर्म आहे. दलित कादंबरीकारांच्या कलाकृतींमध्ये बौद्ध तत्त्वज्ञान यथाप्रसंगी वापरलेले दिसते.

सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' कादंबरीवरही बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो. नागनाथला जेव्हा सब्बबुद्ध भिक्कू भेटतात तेव्हा त्याला बौद्धतत्त्वज्ञानाची प्रचिती ते करून देतात. नागनाथच्या मनातील क्लेश पाहून ते म्हणतात, ''अरे, भुंग्याने लाकूड पोखरावे त्याप्रमाणे तुझा देह दु:ख, व्यथा, वेदना यांनीच पोखरला आहे. अशा तऱ्हेने तू कुठेही गेलास तरी दु:खाचीच सीमा ओलांडता यायची नाही. हे विश्व असीम आहे. जन्म आणि मृत्यू यामधील प्रदेशात दु:खाचे तृण आहे. हे तृण तुडवत जाण्यापेक्षा थोडा मन:संयम करून व हाताची थोडी फडफड करून तू आयुष्यभर चार-पाच रंग का उधळून देत नाहीस?'' [३०] दु:ख हे विश्वातील अंतिम सत्य आहे ते स्वीकारून प्रयत्नवादी राहण्याचा विचार सब्बबुद्ध भिक्कू नागनाथला सांगतात.

''ज्यांना सतत दु:ख, दैन्य, संकटे भोगावी लागतात त्यांना प्रथम सुखाचा व हिताचा शोध घ्यावा लागतो. पण असा प्रयत्न सम्यक ज्ञानाने, विचाराने करायला हवा....... या जगात परमेश्वर नावाची चीज नाही. मग तुला शूद्र हा डाग तो कसा देईल? तुझ्या आयुष्यावर शूद्र हा डाग धूर्त व स्वार्थी लोकांनी मुद्दामच चिकटवला आहे.''[३१] हा अनात्म, अनीश्वरवादी सिद्धांत सब्बबुद्ध भिक्कू नागनाथला सांगतात. मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्या जातीने नव्हे तर कर्तृत्वाने सिद्ध होत असते. हा मौलीक विचारही ते नागनाथला सांगतात, ''खरे सुख मिळविण्यासाठी माणसाला आठ सम्यक मार्गांचा अवलंब करावा लागतो. ते आठ मार्ग म्हणजे - सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृत, सम्यक समाधी.''[३२] हे आठ मार्ग माणसाच्या दु:खाला दूर करण्यासाठी आहेत असे सांगून ते भिक्कू दु:ख या शाश्वत सत्याला नष्ट करण्यासाठी त्याच्या कारणांचा

वेध घेताना दिसतात. याचा परिणाम म्हणूनच रक्ताच्या थारोळ्यात मृत्यूशय्येवर पडलेला नागनाथ शेवटच्या घटका मोजताना म्हणतो, ''खरे शौर्य म्हणजे माणसातील जहरी विषाचा फळासारखा रस करणे ! नुसत्या स्पर्शाने काटेरी झुडपांचे नंदनवन करणे !''[३३]

अशा प्रकारे 'शूद्र' या कादंबरीत बौद्धतत्त्वज्ञानाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. ''नीती म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीती. नीती हे धम्माचे सार आहे. माणसाने माणसांवर प्रेम करण्याच्या आवश्यकतेूनच धम्मात नीतीला स्थान प्राप्त झालेले आहे.''[३८] हा डॉ. आंबेडकर यांचा नीतीबाबतचा विचार बौद्धधम्म काटेकोरपणे पाळतो. एका आदर्श जीवनाचा मार्ग बौद्धतत्त्वज्ञान आपल्याला सांगते हे या कादंबरीवरून ध्यानात येते.

## १२. 'शूद्र' मधील चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्धचा विरोध

दु:ख-यातनांचे ओझे घेऊन जीवनभर हालअपेष्टा, उपेक्षेच्या खोलवर जखमा घेऊन दलित समाजातील माणसे जगत आली आहेत. शिक्षण नाही, जगात थारा नाही, दारिद्र्य पाठ सोडत नाही यामुळे दलितांचे अंधाराचे जीवन पाठ सोडत नाही. अशा हजारो वर्षांच्या पिळवणूकीनंतर डॉ. आंबेडकर यांच्या संघर्षशील विचारातून त्याला आपल्या अस्तित्वाची प्रथमत: जाणीव झाली. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या दलितांनी व पर्यायाने दलित साहित्याने जुनी धर्माधिष्ठित आणि मनुप्रणित विषमताधिष्ठित व्यवस्था नाकारली. 'माणूस' हेच मूल्य माणून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करण्याचा ध्यास दलित साहित्यिकांनी घेतला.

एक नवा समाज उभा करण्यासाठी एक बंडखोर, विद्रोही अशी पिढी तयार झाली. या सगळ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणाच कारणीभूत ठरली. त्यांच्या शिकवणुकीमुळे, विचारांमुळे दलितांमध्ये स्वत:च्या मौलिक अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. त्यांना एक प्रकारचे आत्मभान झाले. धर्मांधाकडून आणि स्वार्थांधांकडून होणाऱ्या अन्यायाची सजगता निर्माण झाली. इथे होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध विद्रोह करण्याची, संघर्ष करण्याची, लढा करण्याची ताकदही निर्माण झाली. अन्याय, अत्याचार, जुलूम जबरदस्तीने ग्रस्त झालेली बंडखोर दलित जनता आणि दलित साहित्यिक चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करून उठले. 'शूद्र' या सुधाकर गायकवाड यांच्या कादंबरीत या वर्णव्यवस्थेविरुद्धचे पडसाद दिसून येतात.

स्वत:वर लागलेला 'शूद्र' हा कलंक समुळ नष्ट करण्याची नागनाथची प्रतिज्ञा ही या चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्धचेच बंड आहे. ज्याला ज्ञान ग्रहण करणे आणि शस्त्र बाळगणे याची परवानगी नाही अशा अस्पृश्य समाजात जन्मलेला नागनाथ हातात शस्त्र घेतो आणि आपल्यावर लादलेले गुलामीचे पाश तोडण्याची प्रतिज्ञा करतो. ''मी छातीवर बाणच घेणार नाही तर ब्राह्मण-क्षत्रियांनी व्यापलेली सर्व भूमीच उलटी करीन.''[३५] हा विद्रोह त्याच्याठिकाणी निर्माण झाला आहे तो या वर्णव्यवस्थेविरुद्धच्या विरोधातूनच.

'' मी आता धनुर्विद्येत प्राविण्य मिळविलेच आहे. मी आपल्या सर्व तरुणांना त्यात तरबेज करीन; आणि त्यानंतर क्षत्रियांनी हल्ला केला तर त्याच्याशी दोन हात करण्याचे सामर्थ्य त्यावेळी निश्चितच आपणात असेल आणि आपला सागला तर

आहे तो सर्वांना तत्त्वज्ञान शिकवू लागेल.''[३६] यासारख्या विधानातून नागनाथचे या व्यवस्थेविरुद्धच्या विरोधाचे स्वरूप लक्षात येते. तो आपल्या भावंडांना, मित्रांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो.'' हे जग मिथ्या असो; परंतु आयुष्यावर चोच मारायला येणाऱ्या कावळ्याला प्रतिकार करायलाच हवा.''[३७] अशी त्याची विचारधारा आहे.

माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या या मनूप्रेरित समाजव्यवस्थेविरुद्ध नागनाथच्या रूपाने 'शूद्र'या कादंबरीत विद्रोहाचे, नकाराचे, विरोधाचे चित्रण झाले आहे. हा विरोध हाच या कादंबरीचा मुख्य धागा आहे. शंकरराव खरात यांच्या 'पारधी' या कादंबरीतील बंडाचे चित्रण आणि 'शूद्र' मधील नागनाथचे बंड यात बरेच साम्य आहे. ''मॅजिस्ट्रेटच्या प्रश्नावर चित्यागत चवताळलेला चित्र्या म्हणतो, 'जगण्यासाठी यापुढे आम्हाला हत्यार काढावं लागेल.' 'म्हणजे ! कसलं हत्यार काढतोस आता?' त्यावर चित्र्या आपल्या हाताच्या मुठी आवळत संतप्त होऊन तोंडातल्या तोंडात बडबडतो..... 'बंडाचं..... बंड केल्याशिवाय आम्हाला आता दुसरा मार्ग कुठला?''[३८] येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की वेदनेला विद्रोहाची जोड दिली तरच क्रांती घडू शकते. 'शूद्र'मधील विरोध हा या वेदना-विद्रोहाच्याच बंडाचे फलित आहे.

## १३. सारांश

अनादिकाळापासून चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था ही माणसाचे माणूसपण नाकारत आली आहे. या नकारामुळेच अनेक अस्पृश्यांची आयुष्येच्या आयुष्ये पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. याचे चित्रण 'शूद्र' या कादंबरीत येते. ''मी शूद्र आहे म्हणजे नक्की

कोण आहे ?'' या प्रश्नाने त्याला अस्वस्थ केले आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची त्याची मरेपर्यंतची धडपड म्हणजे सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र' ही कादंबरी होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीने प्रेरित होऊन दलित माणसात परिवर्तन होत आहे. अन्यायाविरुद्धचा विद्रोह आणि बुद्धपुरस्कृत मानवतावाद यांच्या समन्वयातून ही कादंबरी आकार घेताना दिसते. दलितांना व्यापून उरलेल्या भुकेमुळे त्यांचे दारिद्र्य वाढले आहे. भूक ही त्यांच्या प्रगतीतील मोठा अडसर आहे. उष्ट्या पत्रावळीतील अन्न खातानासुद्धा येथे देहदंडाची अमानूष शिक्षा मिळते. अस्पृश्यतेच्या शापित जीवनाबरोबरच आर्थिक दैन्य, सांस्कृतिक व आर्थिक जीवनातील अनंत प्रश्नांनी दलितांचे जीवन कंगाल करून टाकले आहे. मनुष्य हा बुद्धीने-ज्ञानाने, कर्तृत्वाने श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या जातीने श्रेष्ठत्व ठरते हा विरोधाभास या कादंबरीत दिसून येतो.

स्त्रियांचे अखंड शोषण होताना दिसते. तिला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्वच या समाजव्यवस्थेने नाकारले आहे. पुरूषसत्ताक व्यवस्थेला ती बळी पडलेली दिसते. तिच्यावर अन्याय-अत्याचार, बलात्कार करणे हे या पुरूषसत्ताक व्यवस्थेला पुरषार्थाचे लक्षण वाटते. अंधश्रद्धा हा या दलित समाजाला मिळालेला शापच आहे. अज्ञानामुळे त्यांचे जीवन अंधारमय झाले आहे. त्यामुळे या अंधश्रद्धेतूनच अनिष्ठ रूढी-परंपरांना ऊत आलेला दिसतो.

उच्चवर्णीयांनी केलेला अन्याय-अत्याचार अगतिकतेच्या घेऱ्यात सापडलेल्या दलितांना अक्षरश: पिळवटून काढतो. दलितांच्या अगतिकतेचा फायदा घेऊन उच्चवर्णीय समाज दलितांना दुबळे व अपंग करून टाकतात. यातूनच मग आपल्या

अस्तित्वाची जाणीव झालेला अस्पृश्य या विरोधात बंडाचे निशाण फडकवतो. या कादंबरीतील नागनाथ हे त्याचे प्रातिनिधिक रूप आहे. 'शूद्र' मधील नागनाथचे दु:ख आणि अनुभव हा या समाजातील प्रत्येक दलित व्यक्तीचा आहे, याचे प्रत्यंतर येते.

## १४. निष्कर्ष -

१. दलित कादंबरी जितकी समस्याप्रधान आहे, तितकीच ती प्रबोधनात्मक आहे.

२. धर्माची आणि जातीची तात्विक चिकित्सा करून इथल्या सवर्ण संस्कृतीला हादरे देण्याचे काम दलित कादंबरीकाराने आपल्या कादंबरीद्वारे केले आहे.

३. पौराणिक वातावरणातून आपल्यासमोर येणारी 'शूद्र' ही कादंबरी आजच्या समाजव्यवस्थेचे आणि जीवनवास्तवाचे चित्रण करते.

४. २१ व्या शतकातील हजारो 'नागनाथां'च्या दु:खाचे, अगतिकतेचे, हलबलतेचे प्रतिनिधित्व करणारी कादंबरी म्हणजे 'शूद्र'.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्रोही विचारांचा परिपोष म्हणजे 'शूद्र' ही कादंबरी होय.

६. 'शूद्र' मध्ये भुकेने तडफडणाऱ्या व अपरिहार्यपणे गुलामगिरी स्वीकारलेल्या दलित समाजाचे चित्रण येते.

७. 'शूद्र' मधील अनुभवविश्व एकट्या नागनाथचे नसून संपूर्ण दलित समाजाचे आहे.

८. दलितांना जे विदारक दु:ख भोगावे लागत आहे, त्यापेक्षाही भयानक दु:ख त्या समाजातील स्त्रियांना भोगावं लागतं.

९. तत्कालीन लोकांच्या अंधश्रद्धाळू मानसिकतेचे चित्रण ‘शूद्र’ मध्ये येते.

१०. आर्थिक दैन्य, सांस्कृतिक, आर्थिक जीवन अनंत प्रश्नांनी व्यापून राहिले आहे. या सर्व प्रश्नांमुळे जे जीवन जगावे लागते त्या जीवनजाणिवा ‘शूद्र’ मधून प्रकट झाल्या आहेत.

११. आपल्या वाट्याला आलेले दारिद्र्य, दु:ख, अन्याय, अत्याचार हे सहज स्वीकारून अंधारमय आयुष्य स्वीकारण्याची दलितांची मानसिकता लेखक ‘शूद्र’ मधून निदर्शनास आणून देतो.

१२. अस्पृश्यता, जातीयता, चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था याबरोबरच त्यांच्यातील संघर्षही चिरंजीव राहील यावर लेखकाचा विश्वास आहे.

१३. समूहभावनेबरोबरच लेखकाने स्वीकारलेली सामाजिक बांधिलकीही या कादंबरीच्या अनुषंगाने दिसून येते.

१४. उच्चवर्णीयांच्या अन्याय-अत्याचारातून बकाल झालेल्या अस्पृश्यांच्या दैन्य-दास्याचे चित्रण करणारी ‘शूद्र’ ही कादंबरी सामाजिक प्रश्नांचा उहापोह करताना दिसते.

१५. जीवनाच्या उन्नयनाच्या वाटा मोकळ्या करण्याच्या प्रतिज्ञेतून निर्माण झालेले आंबेडकरी तत्त्वज्ञान दलित कादंबरीतून पाझरताना दिसते.

१६. बौद्ध तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव ‘शूद्र’ वर जाणवतो.

# संदर्भसूची


१. सुधाकर गायकवाड — 'शूद्र'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
द्वितीयावृत्ती – २००५
पृष्ठ क्र. ६

२. सुधाकर गायकवाड — तत्रैव
पृष्ठ क्र. १६

३. सुधाकर गायकवाड — तत्रैव
पृष्ठ क्र. १६

४. यशवंत मनोहर — 'रमाई'
प्रथमावृत्ती १९८३
पृष्ठ क्र. ८६

५. सुधाकर गायकवाड — 'शूद्र'
पृष्ठ क्र. ७

६. अमिताभ वामन नागराळे — 'पड'
साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
द्वितीयावृत्ती – १९९१
पृष्ठ क्र. ११

७. सुधाकर गायकवाड — 'शूद्र'
पृष्ठ क्र. ७

८. सुधाकर गायकवाड — 'शूद्र'
पृष्ठ क्र. २

| | |
|---|---|
| ९. शरणकुमार लिंबाळे | ‘दंगल’<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.<br>प्रथमावृत्ती १९९१<br>पृष्ठ क्र. २१–२२ |
| १०. सुधाकर गायकवाड | ‘शूद्र’<br>पृष्ठ क्र. १४ |
| ११. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ५४ |
| १२. शंकरराव खरात | ‘‘मी माझ्या गावाच्या शोधात’’<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे.<br>प्रथमावृत्ती – १९८३<br>पृष्ठ क्र. ५–६ |
| १३. सुधाकर गायकवाड | ‘शूद्र’<br>पृष्ठ क्र. ३३ |
| १४. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ८२ |
| १५. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ४१ |
| १६. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १५ |
| १७. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १५ |

| | |
|---|---|
| १८. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १७ |
| १९. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. २० |
| २०. हिं. गो. बनसोडे | 'मुक्तिसंग्राम'<br>अभिनव प्रकाशन, मुंबई,<br>प्रथमावृत्ती – १९६९,<br>पृष्ठ क्र. ४१ |
| २१. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. ५१ |
| २२. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ५१ |
| २३. विजय काळे | 'जागृती'<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.<br>प्रथमावृत्ती, १९८५<br>पृष्ठ क्र. ६१ |
| २४. बाबुराव बागुल | 'सूड'<br>अभिनव प्रकाशन, मुंबई.<br>पहिली आवृत्ती – १९७०<br>पृष्ठ क्र. १८ |
| २५. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. ०७ |

| | |
|---|---|
| २६. रणजित देसाई | 'समिधा'<br>मेहता पब्लिकेशन, पुणे.<br>प्रथमावृत्ती १९७९<br>पृष्ठ क्र. ९७ |
| २७. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. १५ |
| २८. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. १४ |
| २९. ना. ब. जाधव | 'दे दान सुटे गिऱ्हाण'<br>मंगल प्रकाशन, नागपूर.<br>प्रथमावृत्ती : शके १९०१<br>पृष्ठ क्र. ७७ |
| ३०. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. ५५ |
| ३१. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ५८ |
| ३२. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ६४ |
| ३३. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ७९ |

३४. रावसाहेब कसबे
'आंबेडकर आणि मार्क्स'
सुगावा प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती : १९८५
पृष्ठ क्र. १४४
मूळ संदर्भ –
'बुद्ध आणि त्याचा धम्म'
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
पृष्ठ क्र. २३१

३५. सुधाकर गायकवाड
'शूद्र'
पृष्ठ क्र. ९

३६. सुधाकर गायकवाड
तत्रैव
पृष्ठ क्र. १८

३७. सुधाकर गायकवाड
तत्रैव
पृष्ठ क्र. ४३

३८. शंकरराव खरात
'पारधी'
मीनल प्रकाशन, कोल्हापूर.
पृष्ठ क्र. ११